RNI No. MAHBIL /2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक १८] शुक्रवार, मार्च १९, २०२१/फाल्गुन २८, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर प्रगटन**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५, २०६ व २०९ अन्वये
क्रमांक पमपा/नरवि/ससंनर/ ६८९ /२०२१

ज्याअर्थी अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राची विकास योजना शासनाचे नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस-१२०४/९४१/ सीआर-१६३/०४/नवि-१२, दिनांक २५ जुलै २००५ अन्वये शासनाने मंजूर केली आहे आणि उक्त विकास योजना दिनांक १२ ऑगस्ट २००५ पासून अंमलात आलेली आहे (यात या पुढे ज्याचा उल्लेख "उक्त ए के बी एस एन ए विकास योजना" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात या पुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३ च्या पोट-कलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग अधिसूचना क्रमांक पनवेल महानगरपालिका – २९१४/व्ही आय फी सं.क्र. ३०१/प्र.क्र. ३५४/नवि-२३, दिनांक २६ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनाकं १ ऑक्टोबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये उक्त ए के बी एस एन ए विकास योजनेतील ११ महसुली गावांचा समावेश पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीत करणेत आलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे. घोट या गावामधील अरुंद रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर जड व इतर वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे घोट गावात वाहतुकीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत व त्याकरिता घोट गावाच्या बाहेरील बाजुने नवीन रुंद वळण रस्ता तयार करण्याची आवश्यकता आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये नवीन रस्ते तयार करणे, रस्त्याची रूंदी निश्चित करणे व रस्त्यांची सुधारणा करणेचा अधिकार महानगरपालिकेला आहे;

आणि ज्याअर्थी, वरील संदर्भ उक्त करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १९० दिनांक ५ सप्टेंबर २०१९ अन्वये आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना प्राधिकृत केले आहे ;

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेल्या तळोजा नदीवरील पुलाजवळील सर्व्हे क्र. ५३ (मौजे-घोट) ते सर्व्हे क्र. ६७ (मौजे-चाळ) येथील विद्यमान रस्त्यास जोडणे करिता २४ मी. रुंद नियोजित रस्त्याचे संरेखन व नवीन सार्वजनिक रस्त्याची आखणी बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५,२०६ व २०९ अंतर्गत या कार्यालयाचे जाहीर प्रकटन क्र. पमपा/नरवि/स.स.न.र/Missing Link/१९४०/२०२०-दिनांक २८ डिसेंबर २०२० अन्वये महाराष्ट्र शासनाचे असाधारण **राजपत्र** क्र. ७८ दिनांक २९ डिसेंबर २०२० व दिनांक ३० डिसेंबर २०२० रोजीच्या दै. लोकमत, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. किल्ले रायगड, दै. रायगड नगरी या वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन नागरिकांकडून वरील प्रकटन शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी वरील प्रकटण बाबतीत नागरिकांकडून विहित मुदतीमध्ये हरकती व सूचना प्राप्त झालेल्या नाहीत;

आणि ज्याअर्थी तळोजा नदीवरील पुलाजवळील सर्व्हे क्र. ५३ (मौजे-घोट) ते सर्व्हे क्र.६७ (मौजे-चाळ) येथील विद्यमान रस्त्यास जोडणे करीता २४ मी. रुंद नियोजित रस्त्याचे संरेखन व नवीन सार्वजनिक रस्त्याची आखणी करण्यास अंतिम मान्यता देण्यात आली आहे;

त्याअर्थी, मी सुधाकर देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका मला प्राप्त अधिकारांन्वये खालील परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या नवीन जोड रस्त्याचे आखणी व परिशिष्ट 'ब' मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे रस्त्याचे संरेखांकन मंजूर करीत आहे.

**परिशिष्ट –'अ'**

**रस्त्याचे संक्षिप्त विवरण**

मौजे. घोट येथील तळोजा नदीवरील पुलाच्या उत्तरेकडील सर्व्हे क्र. ५३ (पैकी) ते मौजे. चाळ येथील सर्व्हे क्र. ६७ (पैकी) पर्यंत २४ मीटर रूंदीचा नवीन सार्वजनिक रस्ता प्रस्तावित करणे.

प्रस्तावित रस्त्याचे संरेखांकनामुळे बाधित होणारे सर्व्हे नं./गट नं. खालील प्रमाणे आहेत:--

| अनु. क्र. | महसुली गावे व त्यातील सर्व्हे नं./ गट नं. |
|---|---|
| १ | <u>**मौजे- घोट :-**</u><br>५३ (पैकी), ६६ (पैकी), ६३(पैकी), ४३ (पैकी), ५९(पैकी),<br>६० (पैकी), ६१ (पैकी), ६२ (पैकी), ६४ (पैकी),<br>३३ (पैकी), ३५ (पैकी). |
| २ | <u>**मौजे- चाळ :-**</u><br>६५ (पैकी), ६७ (पैकी). |

**टीप.**— या व्यतीरिक्त प्रत्यक्ष जागेवर मोजणी करताना अस्तित्वातील सर्व्हे नं. याचांही समावेश असेल.

**परिशिष्ट –'ब'**

प्रस्तावित रस्त्याचे मंजूर संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सहायक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात ठेवण्यात आलेला आहे.

**सुधाकर देशमुख,**
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका.

पनवेल,
दिनांक १८ मार्च २०२१.

**PANVEL MUNICIPAL CORPORATION**

**Public Notice**

Maharashtra Municipal Corporation Act, 1949 section 205, 206 and 209

No. PMC/TPD/ATDP/Missing Links/689/2021

Whereas, the Ambarnath, Kulgaon—Badlapur and Surrounding Notified area Development Plan has been sanctioned by the Urban Development Department, Government of Maharashtra *vide* Notification No. TPS-1204/941/CR-1630/UD-12, dated 25th July 2005 and it has came into force with effect from 12th August 2005 (hereinafter referred to as the said AKBSNA Development Plan) ;

And whereas, the Government in exercise of the power conferred by section 3 of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949 (hereinafter referred to as the "said MMC Act") *vide* the Urban Development Department Notification No. PNP.2014/VIP No. 301/CR. 354/UD-23 dated the 25th September 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of whole area of Panvel Municipal Council and 29 revenue villages specified therein, which came into force with effect from 1st October 2016 ;

And whereas, the said AKBSNA Development Plan's 11 revenue villages has been included in the Panvel Municipal Corporation Area ;

And whereas, at present, heavy and other vehicles ply in large numbers on the narrow road of Revenue Village Ghot thereby increasing the traffic issues in Revenue Village Ghot. Therefore there is a need to develop a new wide road from outside of Revenue Village Ghot ;

And whereas, as per the provisions of the said MMC Act, sections 205, 206, and 209 empowers the Municipal Corporation to prepare the new roads, to decide the width of the roads and to improve the roads within the Municipal Corporation Area ;

And whereas, the Panvel Municipal Corporation *vide* General Body Resolution No. 190 dated 5th September 2019 delegated the powers under section 205, 206 and 209 of the said MMC Act to Commissioner, Panvel Municipal Corporation.

And whereas, Panvel Municipal Corporation has published the Notice *vide* No. PMC/TPD/ADTP/Missing Links/1940/2020, dated 28th December 2020 in Maharashtra Government *Extra-Ordinary Gazette* No.78, dated 29th December 2020 and published in Daily Lokmat, Daily Maharashtra Times, Daily Kille Raigad, Daily Raigad Nagri on 30th December 2020 for inviting suggestions and objections to the said proposed alignment of layout and make a proposed 24m. wide new public road from bridge over Taloja River near S.No. 53(Mouje Ghot) to Survey No. 67(Mouje Chal) connecting to existing road as shown in the Annexure 'A' and Annexure 'B' with the provisions contained in the sections 205, 206 and 209 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 from the public thereof within 30 days from the date of publication of the notice in Maharashtra Government *Extra-Ordinary Gazette;*

And whereas, no suggestions and objections have been received from the public within the prescribed time period;

And whereas, proposed alignment of layout and make a proposed 24m. wide new public road from bridge over Taloja River near S.No. 53(Mouje Ghot) to Survey No. 67(Mouje Chal) connecting to existing road has been sanctioned;

Therefore, as per the powers delegated by Panvel Municipal Corporation to the Commissioner, Panvel Municipal Corporation and in exercise of the powers, I, Sudhakar Deshmukh, Commissioner, Panvel Municipal Corporation here by sanctions the 24m. wide new public road from bridge over

Taloja River near S.No. 53(Mouje Ghot) to Survey No. 67(Mouje Chal) connecting to existing road as mentioned in the Schedule 'A' and a plan appended hereto Schedule 'B'.

**Annexure 'A'**

**Description of Road**

Sanctioned 24 m. wide new road connecting Ghot river bridge Survey No. 53 (Revenue Village Ghot) to Existing Waste Management Site, Survey No. 67 (Revenue Village Chal).

Details of Survey No. of lands affected by the proposed alignment of the new road are as below:–

| Sr. No. | Name of Revenue village and Survey No. |
|---|---|
| 1 | **Mouje Ghot :-**<br>53(p), 66(p), 63(p), 43(p), 59(p), 60(p), 61(p), 62(p), 64(p), 33(p), 35(p). |
| 2 | **Mouje Chal :-**<br>65(p), 67 (p). |

*Note*.— Other than the above listed survey numbers, if any other survey number existed while laying out the road then it will also be the part of the above proposed road.

**Annexure 'B'**

Plan showing proposed sanctioned alignment of the road is kept open for Inspection for the public on all working days and in working hours in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation.

SUDHAKAR DESHMUKH,
Commissioner,
Panvel Municipal Corporation.

Panvel,
dated the 18th March 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.